नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील कत्तलखाने बंद ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्र.एमयुएम-२०१७/प्र.क्र.१०७५/नवि-१७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांकः- २९ जून, २०१९.

<u>वाचा</u>:- (१) शासन पत्र क्र.एमयुएम-१०८८/८३३/सीआर-७२/नवि-२५, दि.१२.०५.१९८८.
(२) शासन पत्र क्र.संकिर्ण १०/२००२/प्र.क्र.१११/नवि-२७, दि.२८.०३.२००३.
(३) शासन पत्र क्र.संकिर्ण-१०२००४/प्र.क्र.१२१/नवि-२०, दि.०७.०९.२००४.
(४) केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे FOOD SAFETY AND STANDARDS (LICENSING AND REGISTRATION OF FOOD BUSINESS) REGULATIONS 2011.
(५) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.५७२/२०१६ बॉम्बे मटण डिलर असोसिएशन विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर मध्ये मा.न्यायालयाने दि.१४.०९.२०१५ रोजी दिलेले अंतरीम आदेश.

<u>प्रस्तावना:-</u>

संदर्भाधीन शासन पत्र दि. १२ मे, १९८८ अन्वये प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र दिन, गांधी जयंती, रामनवमी, महावीर जयंती, संवत्सरी या दिवशी कत्तलखाने बंद ठेवण्याबाबत सूचना, तसेच साधु वासवानी यांचा २५ नोव्हेंबर हा जन्मदिन मांस रहित दिवस पाळण्याचा सल्ला नगरपालिका व महानगरपालिकांना देण्यात आला होता.

२. संदर्भाधीन शासनपत्र दि. २८.०३.२००३ अन्वये महावीर जयंती दिवशी कत्तलखाने व मांस विक्री दुकाने बंद ठेवण्याबाबत कार्यवाही करण्याचे नगरपालिका व महानगरपालिकांना कळविलेले होते. तसेच महावीर जयंती दिवशी बकरी ईद असल्यास मुस्लीम बांधवांना धार्मिक पशुवधासाठी परवानगी देण्याचे सूचित केले होते.

३. संदर्भाधीन शासनपत्र दि. ०७.०९.२००४ अन्वये जैन धर्मीयाचे पर्युषण पर्वातील श्रावण वद्य १२ व भाद्रपद शुध्द ४ संवत्सरी पर्व या दिवशी कत्तलखाने व मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याबाबत कार्यवाही करण्याचे महानगरपालिका व नगरपालिकांना कळविण्यात आले होते. याच पत्रान्वये पर्युषण पर्वातील उर्वरित दिवशी (श्रावण वद्य १३ ते भाद्रपद शुध्द ३ व ५) कत्तलखाने व मांस विक्रीची दुकाने बंद करणे समयोचित ठरावे असे नमूद करुन सर्व कत्तलखाने व मांस विक्री दुकानदारांना कत्तलखाने व मांस विक्री बंद करण्याबाबत आवाहन करण्याबाबत सूचित करण्यात आले होते.

४. रिट याचिका क्र. ५७२/२०१६ बॉम्बे मटन डिलर असोसियशान विरुध्द महाराष्ट्र शासन, प्रकरणी मा. न्यायालयाने दि. १४.०९.२०१५ रोजी खालीलप्रमाणे अंतरीम आदेश दिले आहेत:-

22. In light of the above discussion, we pass the following interim order:

(i) pending the hearing and final disposal of the petition, the directions contained in the State Government Notification/Circular dated 7 September 2004 and the Respondent Corporation Notifications/Circulars/Orders as regards closure of meat selling shops and the prohibition on selling of meat during Paryurshan are stayed. In as much as in the present Petition we are concerned with mutton dealers from Mumbai and the Deonar abattoir, we clarify that the stay would extend to areas falling under Mumbai Municipal Corporation;

(ii) The State Government and Respondent Corporation to come out with appropriate policy and file Affidavits in Reply within four weeks.

५. राज्यात निरनिराळ्या सणांच्या दिवशी कत्तलखान्यात होणाऱ्या जनावरांच्या कत्तली बंद ठेवण्याबाबत विश्व हिंदू परिषद, नागरीक समिती मलकापूर इत्यादी संस्थांनी शासनाकडे निवेदने सादर केली आहेत.

६. उपरोक्त पार्श्वभूमीवर नागरी स्थानिक संस्थांतील कत्तलखाने बंद ठेवण्यासंदर्भात निदेश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन परिपत्रक:-</u>

उपरोक्त नमूद पार्श्वभूमी तसेच रिट याचिका क्र. ५७२/२०१६ बॉम्बे मटण डिलर असोसिएशन विरुध्द महाराष्ट्र शासन, प्रकरणी मा. न्यायालयाने दि. १४.०९.२०१५ रोजी दिलेल्या अंतरीम आदेशास अनुसरुन नागरी स्थानिक संस्थांतील कत्तलखाने बंद ठेवण्यासंदर्भात शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

केंद्र शासनाच्या Ministry of Health and Family Welfare (Food Safety and Standards Authority of India) ने कत्तलखान्यांना परवानगी देताना निश्चित केलेल्या FOOD SAFETY AND STANDARDS (LICENSING AND REGISTRATION OF FOOD BUSINESS) REGULATIONS 2011 मधील तरतूद पहाता, कत्तलखाना बंद ठेवल्याने (त्यादिवशी मांसविक्रीस प्रतिबंध नाही) मांसाहारी जनतेची गैरसोय होणार नाही व शाकाहारी जनतेच्या मताचा आदर राखला जाईल. याचा विचार करता शासनाने ठराविक दिवशी कत्तलखाने बंद ठेवण्याबाबत निर्णय घेण्यापेक्षा मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या

कलम ४०६, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४६६, महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम २६६(२) मधील तरतुदीनुसार संबंधित आयुक्त, महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपरिषद यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील नागरीकांच्या मागणीनुसार महासभेपुढे ठराव मांडून त्या-त्या वेळेच्या स्थानिक परिस्थितीनुसार उचित निर्णय घ्यावा.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०६२९१५१५४३६४२५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Kailas Madhukar Badhan

Digitally signed by Kailas Madhukar Badhan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=22804d8f98c03e9a67ca8eca6a02e7eaab4bcc4a3d59dfce4f1c7189ab74b085, serialNumber=e83c1c73de120837488d76379734db4868992e2b35ba1df8cfea9650fcff780f, cn=Kailas Madhukar Badhan
Date: 2019.06.29 15:19:09 +05'30'

(कैलास बधान)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२. सर्व सन्मानीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य
३. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
७. मा.लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय
८. मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी
९. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१०. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.
११. विभागीय आयुक्त (सर्व).
१२. जिल्हाधिकारी (सर्व).
१३. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व)
१४. प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती (नवि-१७).